पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

स्थापना : जून १९९२

बहुजन हिताय, बहुजन सुखाय।

PDEA
Pune District Education Association

# प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

से.नं.२८, गंगानगर, प्राधिकरण, आकुर्डी, पुणे - ४११ ०४४. फोन : ०२० - २७६५०२७६

फॅक्स : ०२० - २७६५९७४० ई-मेल : rmacscollege@yahoo.co.in वेबसाईट : www.rmacs.co.in

पुणे विद्यापीठाशी संलग्न ( आयडी नं. पीयू / पीएन / एएससी / ०९० / १९९२ )

संस्था पदाधिकारी

अध्यक्ष
ना. अजित पवार

उपाध्यक्ष
नितीनशेठ साबळे

मानद सचिव
सतीश उरसळ

खजिनदार
ॲड. मोहनराव देशमुख

उपसचिव
एल्. एम्. पवार

प्राचार्य
डॉ. नितीन घोरपडे

जावक क्र. : आरएमसी/अे | 1218/2011-12 दिनांक : 27/01/2012

प्रति,
**मा. प्राचार्य**
पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये
(पुणे शहर)

**विषय : महाविद्यालय विद्यापीठ प्रतिनिधी व कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेसाठी विद्यार्थ्यांना पाठविणेबाबत..**

महोदय,

आपणास कळविण्यास आनंद वाटतो की, 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळा'चे प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, हे पिंपरी चिंचवड शहरातील महाविद्यालय असून या महाविद्यालयात कला, वाणिज्य व विज्ञान, बीबीए, बीसीए, बीएस्सी संगणकशास्त्र हे सहा पदवी अभ्यासक्रम तसेच पदव्युत्तर कला विभागात मराठी, इंग्रजी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, मानसशास्त्र, वाणिज्य विभागास एम. कॉम, एमसीए व विज्ञान विभागात फिजिक्स, केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, संगणकशास्त्र, एमसीए (विज्ञान) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम तसेच अर्थशास्त्र विभागात एम. फिल व पीएच.डी. हे अभ्यासक्रम सूरू असून महाविद्यालयाच्या पदवी व पदव्युत्तर विभागात मिळून ५५०० विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत.

आमचे महाविद्यालय आणि विद्यार्थी कल्याण मंडळपुणे विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यामाने पुणे शरातील पुणे विद्यापीठशी संलग्न महाविद्यालयातील विद्यापीठ प्रतिनिधी व कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांसाठी **' नेतृत्वगुण विकास'** या विषयावर **गुरूवार दिनांक ०९ फेब्रुवारी २०१२ रोजी कार्यशाळा** आयोजित केलेली आहे.

**या कार्यशाळेत मा. अविनाश धर्माधिकारी, मा. डॉ. अरूण अडसुळ, मा. डॉ. संभाजी पठारे, मा. डॉ. सुधाकर जाधवर, मा. डॉ. अशोक चासकर, मा. डॉ. दिपक माने या मान्यवर साधक व्यक्ती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.**

या कार्यशाळेसाठी नाव नोंदणी सकाळी ८.३० ते ९.०० या वेळेत होईल

या विद्यार्थ्यांसाठी भोजन, चहापान, नाष्टयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**कार्यशाळेत उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च ( बसचा ) कार्यशाळेमध्ये देण्यात येणार आहे.**

आपणास विंनती की, या कार्यशाळेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या विद्यापीठ प्रतिनिधी व कमवा व शिका योजनेतील एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी यांना पाठवून कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे ही विनंती

आपला विश्वासू

( डॉ. नितीन घोरपडे)
प्राचार्य
प्रा. रामकृष्ण मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकुर्डी, पुणे - ४४.